शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे.
जा.क्र. - मनपा/शिक्षण/सप्राशा/तु.मा./110
दिनांक -

शाळा प्रमुख,
सोसायटी ऑफ कॉस्मेलेटिन
होली एंजल्स प्राथ. शाळा यांस -
७, नगररोड, येरवडा, पुणे-४११००६

विषय - मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन तुकडया उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र
जा.क्र. - प्रा/प्रशि/जा.तु./पी.आर./3296
दिनांक - 29/3/९८

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकडयांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या इयत्तांच्या जादा तुकडीस/ नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९८ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | जादा तुकडी, नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| होली एंजल्स (इंग्रजी) | इ.५ वी ची | पहिली तुकडी | मंजूर |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.

(२) सदर वाढीमुळे सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

(३) जादा वर्गास शिक्षक नेमतांना विहित पदवीधर/वेतील व प्रशिक्षित (डी.एड.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक - 2/6/९८

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे – ४११ ००५.
जा.क्र./मनपा/खाप्राशा/४८८८/२००१–२००२,
पुणे,दिनांक :– १४/१/०२

शाळाप्रमुख,

होली एंजल्स प्राथमिक शाळा
येरवडा पुणे ६

विषय :– खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना-
अनुदानित प्राथमिक शाळांना सन २०००–२००१
या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त
तुकड्या/वर्ग मंजूर करणेबाबत.

संदर्भ :– १] प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्रमांक–खाप्राशा/
२०००/तुमा/६०७३२/ड–५१२ दि. २९.११.२००१.
२] मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील पत्र जा.क्र.
प्रा/प्राशि/खाप्राशा/वर्ग–तुकडी/मंजूरी/पुवि/
२६३०७/०१ दि. १३.१२.२००१.

वरील विषयासंबंधीचा आपणांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या अतिरिक्त वाढीच्या तुकड्या विना/अनुदान/कायम विनाअनुदान तत्वावर जून २००० पासून सन २०००–०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ नैसर्गिक/अतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | होली एंजल्स प्राथमिक शाळा | इंग्रजी | ६ वी च्या प्रथम वर्ग | नैसर्गिक |
| | | | इयत्ता २ री ची दुसरी तुकडी | अतिरिक्त |

....२/–

अटी व शर्ती :-
==========

१. ज्या शाळांना जून २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून २००४ पासून अनुदानास पात्र ठरवितांना शासन निर्णय क्रमांक-व्हीएलएस-२०००/[२४५५]/प्राशि-१ दि.८.११.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणा-या या वर्गाला/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्यावर्षी उपलब्ध करुन घेण्याची दक्षता संबंधित शिक्षणाधिकारी [प्राथमिक] जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख,महानगरपालिका शिक्षण मंडळ,/प्रशासन अधिकारी,महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.

२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३. सदर शाळेने वर्ग/तुकडयांसाठी सर्व भौतिक,शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यात.

४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा चांगली असणे आवश्यक आहे.

५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

६. सदर मंजूर करण्यात येणा-या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

७. सदर शाळेच्या मंजूर करण्यात आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.

८. तपासणी अंती एक जरी अट अथवा शर्त नियमबाहय निदर्शनास आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका.

प्रत - माहितीसाठी.

१] मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,
पुणे - ४११ ००१.

जा.क्र.मा.प्राशि/खाप्राशा/तु.मा./पुवि/०२ ५२१८१/०२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 27 NOV 2002

प्रति,

१. ~~शिक्षणाधिकारी (प्राथमिक),~~
~~जिल्हा परिषद,~~

२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.

३. ~~प्रशासन अधिकारी,~~
~~महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ~~

विषय : विनाअनुदानित/कायम विना अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना सन २००१-०२ या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वाढ/अतिरिक्त तुकडी वर्ग मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडील खाप्राशा/०२/तु.मा./६०७३३/ड-५१२, दि. १२.११.२००२ चे पत्र.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळांना वर्ग/तुकडया सन २००१-०२ या वर्षापासून *कायम विना अनुदान तत्वावर* व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही तसेच भविष्यात अनुदानाची मागणी करणार नाही व 'सदरचे वर्ग प्रत्यक्षात सुरु असतील' या अटीवर संदर्भाधीन पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | होली एंजल्स प्राथमिक शाळा येरवडा, पुणे-६ | इंग्रजी | म.न.पा. | ७ वी चा प्रथम वर्ग. | मंजूर |

सदर प्राथमिक शाळांना वर्ग/तुकड्यांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

मूळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

१. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
होली एंजल्स

२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
यांचेकडे संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

तात्काळ

जून- २००२ पासून कायम विनाअनुदान

जा.क्र. माध्य. ३ (१४) /नमाशा/मान्यता/
पुवि / २०६१४ २००३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.

दिनांक 05/SEP 2003

प्रति,

सचिव, सोसायटी ऑफ कुरमलाईटस,
खडकी, जि. पुणे.

विषय - सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ - १] शासन पत्र क्रमांक : नमाशा-१००३[३?७/ २००३ ] माशि-१, दि. २३.५.२००३

२. शि.अ. [माध्य]जि. प. पुणे प.क्र. शिक्षण माध्य ६-४/६४८ / ६८३ ०३-०४ दि. १८.८.०३/२.९.०३

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदाला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून ....२००२..... पासून ~~विना अनुदान तत्वावर~~/कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) या नवीन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त) शासनाने विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२) सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालण करणे आवश्यक आहे.

३) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५) जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राध्यान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देगणी स्विकारण्यात येवू नये.

६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये

७) माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९) शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करून देण्यात येईल.

१०) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१२) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

१३) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

इतर अटी -

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५) सदर परवानगी दिलेल्या शाळेच्या संस्थेविरुद्ध कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | सोसायटी ऑफ करमलाईटस, खडकी, जि. पुणे. | येरवडा, पुणे. | आठवी | इंग्रजी |

जून- २००२ पासून कायम विनाअनुदान तत्वावर शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

कायम विना अनुदान

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३, १ नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे - १ करिता

स्वाक्षरीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

प्रतिलिपी -

१) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे. यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पुणे करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा, तसेच संस्थांविरुद्ध तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्य. शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

१) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

२) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - २ यांना सविनय सादर.

३) निवडनस्ती

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/०३-०४
पुणे. दिनांक : ३/१०/२००३

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
होली एंजल्स कॉन्व्हेंट स्कूल,
येरवडा, पुणे-६.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.२००३-०४
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~.

आपल्या ~~सोसायटी ऑफ करमेलाईट्स, खडकी, पुणे~~ या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित होली एंजल्स कॉन्व्हेंट स्कूल, येरवडा, पुणे-६ माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५~~ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/23029/24, दि. 25/6/03 अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००३ पासून नैसर्गिक-वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी~~ [दक्षिण], ~~जिल्हा परिषद~~, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

J. N. H

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणेकरिता.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/03-०४
पुणे. दिनांक : २८/७/२००४

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
होली एंजल्स कॉन्व्हेंट स्कूल,
येरवडा, पुणे-६

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००४-०५
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी.

आपल्या सोसायटी ऑफ करमेलाईट्स, रवडकी, पुणे या शैक्षणिक संस्थेव्दारा संचालित होली एंजल्स कॉन्व्हेंट स्कूल, येरवडा, पुणे-६ माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५ वी~~.चा वर्ग सुरु करणेस सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/२३०२९/२८, दि. २५/९/०३. अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००४ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी~~, जिल्हा परिषद, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती ~~हवेली~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

(स्वाक्षरी) २८/७

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै.माऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे-५.
जावक क्रमांक - सप्रशिा/ ५५५४ /१९९५-९६.
पुणे, दिनांक - १८/२/९६

शाळा प्रमुख,
इन्फंट जीझस प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम)
नगररोड, येरवडा, पुणे ४११००६ यांस -

विषय - खाजगी प्राथमिक शाळेस मान्यता देणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. ११७ दि. २६-१२-९५.

तुमचे शाळेस सन ९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटींची पूर्तता करण्याचे अटीवर मान्यता देण्यात येत आहे. सदरची मान्यता प्रत्यक्ष सुरु असलेल्या इ. १ ली ते २री च्या वर्गांकरिता असेल.

१) सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

३) शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

४) संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

५) संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमल - बजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वियन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक त्या सुविधा पुरविल्या पाहिजेत.

६) संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वीत ठेवल्या पाहिजेत.

७) शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

.....(२)

८) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादींमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

९) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

१०) संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

११) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

सदर अटींची पूर्तता न केल्यास शाळेस दिलेल्या मान्यतेबाबत फेरविचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी तुमचे शाळेतील खालीलप्रमाणे माहिती वेगवेगळ्या तक्त्यात दोन प्रतीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

तक्ता क्र.१

| | इयत्ता | तुकडी | विद्यार्थी | | | सरासरी हजेरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | |
| | | | | | | |
| एकूण | | | | | | |

तक्ता क्र.२

| अ. क्र. | शिक्षकाचे नाव | जात | जन्म दिनांक | नोकरीस लागल्याचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

कळवे, दि. 3/2/95

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे म.न.पा
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना शिवाजीनगर पुणे ५

जा.क्र. मनपा/शिक्षण/खाप्राशा/ ४०२९
दिनांक - १७/११

शाळाप्रमुख,
होली एंजल्स प्राथ. शाळा
७, नगर रोड, येरवडा,
पुणे - ४११ ००६.

विषय - मान्य खाजगी प्राथमिक शाळांना - नवीन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - तुमचे पत्र जा.क्र. १/९५, दि. १७/९५.

संदर्भांकित पत्रान्वये तुम्ही पाठविलेल्या तुकडी मान्यतेच्या प्रस्तावाची छाननी केली असता तुमचे शाळेस इ. २ री च्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास १९९५-९६ पासून परवानगी देण्यात येत आहे.

कळावे. दि. २०/१०/९५.

Sd/- १७/११
शिक्षण प्रमुख
शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/सप्रशा/तु.म./
दिनांक -

298
7017

शाळा प्रमुख,
होली एंजल्स प्रायमरी स्कूल,
७ नगर रोड, येरवडा, पुणे-६ यांस -

विषय : मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भ : मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र जा.क्र. - प्रा/प्राशि/जा.तु./पी.आर./ ३८७६ दि. २।४।९७

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकड्यांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या इ. ३, ४ इयत्तांच्या ~~जादा तुकडीस~~, नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९६-९७ पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | ~~जादा तुकडी~~, नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| होली एंजल्स प्राय. स्कूल | इ. ३रीची<br>इ. ४थीची | १ ली तुकडी<br>१ ली तुकडी | } मंजूर |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.
(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.
(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित (डी.एड.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक - १०।४।९७

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.